# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबईतील भायखळा येथील सर जी.जी. समूह रुग्णालय व ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वर्ग-१ ते वर्ग-४ या संवर्गातली रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) २८०० (२५-०३-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भायखळा येथील सर जी.जी. समूह रुग्णालयात उपचारांसाठी येणाऱ्या रुग्णांना उत्तम दर्जाच्या सेवा मिळण्यासाठी जे. जे. रुग्णालय व त्याच बरोबर ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालायतील वर्ग-१ ते वर्ग-४ या संवर्गातली रिक्त पदे भरण्याचे तत्कालीन वैद्यकीय मंत्री महोदयांनी दिनांक २९ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास आश्वासन देऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप रिक्त पदे न भरण्याची कारणे काय आहेत व ती केव्हा पर्यंत भरण्यात येणार आहेत,

(३) असल्यास वर्ग-१ ते वर्ग-४ मधील प्रलंबित रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२१-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील गट-अ व गट-ब मधील १२३२ अध्यापकीय पदे व प्रशासकीय पदे सरळसेवेने भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. आयोगाकडून पात्र उमेदवारांच्या शिफारशी प्राप्त होताच पदस्थापनेबाबतची कार्यवाही करता येईल. तसेच पदोन्नतीच्या कोट्यातील पदे भरणेबाबत कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे गट-क व गट-ड मधील रिक्त पदे भरण्याबाबत संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई तसेच ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्यास्तरावर नियमानुसार कार्यवाही सुरू आहे.

---

**सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, नागपूर येथे संगणकीय टोकन प्रणालीचे सॉफ्टवेअर खराब झाल्याबाबत**

**(२) ४०५८ (१४-०३-२०२०). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, नागपूर येथे रूग्णांच्या सोयीकरिता संगणकीय टोकन प्रणाली सुरू करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सॉफ्टवेअर खराब झाल्याने संगणकीय टोकन प्रणाली ठप्प पडल्यामुळे पुन्हा चिठ्ठीवरच नोंदणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संगणकीय टोकन प्रणालीकरिता रू. १२ लक्ष निधी खर्च करण्यात आला असून संबंधित कंत्राटदाराकडून या प्रणालीची दुरूस्ती न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२२-१२-२०२१) :**(१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे

(३) व (४) स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत खरेदी करण्यात आलेल्या मशीनचा सर्वसमावेशक देखभाल करार करण्यात आलेला होता. सदर कालावधीत संबंधीत कंपनी प्रतिसाद देत नसल्यामुळे मशीन नादुरुस्त होते. या कालावधीत बाह्यरुग्ण विभागामध्ये रुग्णनोंदणी प्रक्रिया ओपीडी पेपरव्दारे चालू ठेवण्यात आली होती. उक्त प्रकरणी संस्था स्तरावर त्रिसदस्य समितीचे गठण करुन चौकशी करण्यात आली. सदर चौकशी समितीने "पुरवठादार कंपनीचा काळ्या यादीत समावेश करणे व टोकन प्रणाली दुस-या पुरवठादारामार्फत दुरुस्त करणे, दुरुस्तीचा खर्च अवास्तव असल्यास एचएमआयएस प्रणालीचा वापर करणे" असे निष्कर्ष नोंदविले असून सदर निष्कर्षाच्या अनुषंगाने दुस-या पुरवठादारामार्फत सदर मशीन दुरुस्त करण्यात आलेले आहे. सदर संगणकीय टोकन प्रणाली आजतागायत सुरळीत कार्यरत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**आरोग्य विभागाअंतर्गत कंत्राटी वाहन चालकांना न्याय मिळणेबाबत**

**(३) ४७२६ (३१-०१-२०२२). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत सुमारे १८०० वाहन चालक हे त्यांचे वर्गवारीनुसार रेफरल ट्रान्सपोर्ट, जिल्हापरिषद कंत्राटी, रोजंदारी, आ.पी.एच.एस. आणि बाहय यंत्रणा अशा प्रकारात मोडत असून हे सर्व वाहनचालक शासनाच्या प्राथमिक आरोग्य केंद्र ग्रामीण रुग्णालय उपजिल्हा रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालय इ. शासकीय आरोग्य संस्थामध्ये कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे सर्व वाहनचालक गेल्या ९ ते १४ वर्षापासून कमी वेतनावर काम करीत असून या वाहनचालकांना समान काम व समान वेतन देण्यात यावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य वाहनचालक संघटनेच्यावतीने शासनाकडे गेल्या अनेक वर्षापासून करण्यात येत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी लोकप्रतिनिधीनी शासनाकडे पत्र-निवेदने देऊन या कंत्राटी कर्मचाऱ्यांना न्याय देण्याबाबत दि. १३ डिसेंबर २०१९ रोजी पत्रान्वये मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (३१-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या दिनांक ५.३.२०१८ च्या पत्रान्वये किमान वेतनाच्या कायद्यानुसार वाहनचालकांना वेतन द्यावे, अशा सूचना सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात आल्या आहेत. तसेच माहे जुलै, २०१८ मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान रेफरल ट्रान्सपोर्ट कार्यक्रमांतर्गत ८१८ रुग्णवाहिकांवर वाहन चालक नेमण्यासाठी सेवा पुरवठादारांकडून निविदा प्रक्रियेद्वारे निवड करण्यात आलेल्या वाहन चालकांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन द्यावयाचे बंधनकारक करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय व डॉ वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विविध समस्यांबाबत

**(४) ४७७४ (२२-०३-२०२०). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात रुग्णांसाठी आवश्यक ट्रॉमा, बर्नर, एनआयसीय, पॅथलॅब इत्यादी ठिकाणी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे तसेच डॉक्टर व कर्मचाऱ्यांची संख्या अपूरी असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या रुग्णालयातील विविध समस्यांचा आढावा घेऊन येथे आवश्यक सुविधा व आवश्यक डॉक्टर व कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (१५-०२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे
(२) पदभरतीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील गट-अ व गट-ब मधील १२३२ अध्यापकीय पदे व प्रशासकीय पदे सरळसेवेने भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरीता २८६ अध्यापकीय पदांचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे गट-क व गट-ड मधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या मार्फत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**पिंपरी-चिंचवड व पुणे शहरातील धर्मादाय व खाजगी रुग्णालयांकडून कोरोना ग्रस्त रुग्णांची होणारी आर्थिक फसवणूक**

**(५) १२४१२ (१०-०९-२०२०). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात साथीरोग प्रतिबंधक कायद्याखाली कोरोनाबाधित रुग्णांवर उपचार करणाऱ्या रुग्णालयांना उपचाराच्या खर्चाचे दर पत्रक निश्चित केले असल्याची स्वतंत्र अधिसूचना दिनांक १३, मार्च २०२० रोजी वा त्यासुमारास निर्गमित केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास.पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरात कोरोना रुग्णांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत असून परिणामी कोरोना चाचणी करण्यासाठी रुग्णांची संख्या वाढत आहे तथापि कोरोना चाचणीसाठी खासगी रुग्णालयातून अतिरीक्त शुल्क आकारण्यात येत असल्याने अनेक नागरिकांना जादा शुल्क देणे शक्य नसल्याने नागरीक कोरोना चाचणी करणे टाळत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पिंपरी-चिंचवड व पुणे शहरातील अनेक धर्मादाय व खासगी रुग्णालयातून विशेषता धनकवडी येथील पुणे-सातारा रस्त्यावरील भारती हॉस्पिटल सह दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात कोरोनाबाधीत रुग्णांकडून निश्चित करून दिलेल्या दरपत्रकातील रकमेपेक्षा अधिक रकमेचे बिल वसूल तसेच आर्थिक पॅकेज द्वारे फसवणूक करत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, पिंपरी-चिंचवड शहरात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता कोरोना झालेल्या रुग्णांना टिलेटर आणि ऑक्सिजनचे बेड शहरातील दवाखान्यात उपलब्ध होत नसून खासगी रुग्णालयात रुग्णांची आर्थिक फसवणूक होत असल्याने शहरातील सर्व धर्मदाय व खाजगी रुग्णालयांमध्ये शासनाच्या "महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना" राबवणे बाबत स्थानिक लोकप्रतीनिधींनी यांनी दिनांक २३ जुलै रोजी मा. मुख्यमंत्री यांना ई-मेल द्वारे व प्रत्यक्ष भेटीत तसेच सार्वजनिक आरोग्यमंत्री यांना ई-मेल द्वारे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पिंपरी-चिंचवड व पुणे शहरातील अनेक धर्मादाय व खासगी रुग्णालयातून कोरोना ग्रस्त रुग्णांची होत असलेली आर्थिक फसवणूकीसंदर्भात चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली आहे काय,

(६) असल्यास, पिंपरी-चिंचवड व पुणे शहरातील कोरोनाग्रस्त रुग्णांकडून जादा शुल्क आकारणाऱ्या रुग्णालयावर कारवाई करण्यासह निर्धारित केलेल्या दर पत्रकानुसार शुल्क आकारण्यासह खाजगी व धर्मदाय रुग्णालयात"महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राबवण्याबाबतचा शासनस्तरावर प्रलंबित असलेला प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२१-०१-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे

तथापि खाजगी रुग्णालयांमध्ये कोरोनाबाधित रुग्णांच्या उपचाराबाबत दर नियंत्रणा संबंधीच्या अधिसूचना दिनांक ३०.०४.२०२०, २१.०५.२०२०, ३१.०८.२०२०, ३०.११.२०२०, १५.१२.२०२०, २७.०२.२०२१, ०१.०६.२०२१, ०४.०८.२०२१ व दि.०१.०९.२०२१ रोजी निर्गमित केल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

खाजगी प्रयोगशाळांनी कोवीड-१९ तपासणीच्या चाचणीचे दर शासनस्तरावरून वेळोवेळी निश्चित करण्यात आले आहे. व त्यानुसार रुग्णांकडून दर आकारणी करण्यात येते.

शासकीय आरोग्य संस्थांमध्ये या चाचण्या नि:शुल्क करण्यात येत आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतंर्गत कोरोनाबाधित रुग्णांकडून अधिक रक्कमेचे बिल वसूल तसेच आर्थिक पॅकेजद्वारे फसवणूक केल्याबाबत भारती हॉस्पीटल विरुध्द एकूण ९ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ६ तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे. तसेच ३ तक्रारी निराकरणाच्या प्रक्रियेत आहेत. दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाविरोधात एकूण ३ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्यापैकी २ तक्रारीचे निराकरण करण्यात आले आहे, तसेच १ तक्रार निराकरणाच्या प्रक्रियेत आहे.

(४) हे अशंत: खरे आहे.

मा. लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८.०८.२०२० रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांना यासंदर्भात निवेदन दिलेले आहे.

(५) होय हे खरे आहे.

संबंधित महानगरपालिकेमार्फत खाजगी रुग्णालयांतील कोवीड-१९ रुग्णांचे देयकांची चौकशी करण्यासंदर्भात समिती नेमण्यात आलेली आहे.

(६) हे अशंत: खरे आहे.

दिनांक ३१.०८.२०२० रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार खाजगी रुग्णालयांचे उपचार दर नियंत्रित करण्यात आले आहेत.

तसेच मा. लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री महोदय यांना दिलेल्या दि. २८.०८.२०२० रोजीच्या निवेदन पत्रामध्ये नमूद केल्यानुसार पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील धर्मादाय व नामांकित खाजगी रुग्णालयांपैकी रुबी हॉल रुग्णालय, के.ई.एम. व जहांगीर हॉस्पिटल, पुणे ही रुग्णालये एकत्रित महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतंर्गत अंगीकृत करण्यात आली आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील विलेपार्ले (पश्चिम) येथील नानावटी रुग्णालयाकडून कोविडग्रस्त रुग्णांची आर्थिक फसवणूक होत असल्याबाबत**

**(६) १२८९४ (१४-०९-२०२०). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विलेपार्ले पश्चिम येथील नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या ७६ वर्षीय कोविड ग्रस्त रुग्णाकडून रुग्णालयाने रु. १६ लाख इतके वैद्यकीय देयके आकारले असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर रुग्णालय व्यवस्थापनाने १४ दिवसाच्या करोना उपचाराचे ६,७८,४१६ (६ लाख ७८ हजार ४१६) रुपये बिलापैकी ५,२८,००० (५ लाख २८ हजार) रुपयाचे बिल अदा न केल्याने ६० वर्षीय महिलेचा मृतदेह ताब्यात देण्यास टाळाटाळ केल्याचा प्रकार दि. १२ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने राज्यभरात कोविड तसेच इतर आजारांचे उपचार करण्याऱ्या खाजगी रुग्णालयांना उपचाराकरिता दर निश्चिती केली असतानाही सदर रुग्णालयाकडून रुग्णांची लुट होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले आहे,

(५) असल्यास, त्यानूसार खाजगी रुग्णालयाबाबत शासनाने शासन निर्णय जारी करुन निश्चित केलेले दर न आकारता रुग्णांकडून अवास्तव देय आकारून आर्थिक फसवणूक करणाऱ्या व नियमानुसार रुग्णांच्या नातेवाईकाकडे बिलाची पुरेशी रक्कम नसल्यास हमी (अंडरटेकींग) घेऊन मृतदेह ताब्यात देण्याची तरतुद असतानाही मृतदेह ताब्यात न देणाऱ्या रुग्णालय व्यवस्थापना विरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

श्री. सेवंतीलाल हिम्मतलाल पारेख हे दि. ३१.०३.२०२० ते १५.०४.२०२० पर्यंत १५ दिवस नानावटी रूग्णालयात दाखल होते. त्या रूग्णालयाचे बील रू. १६,०६,४९७/- (सोळा लाख सहा हजार चारशे सत्याण्णव फक्त) इतके झाल्याची तक्रार प्राप्त झाली होती. रूग्णाालयाने रू. ५,६०,०००/- (पाच लाख साठ हजार फक्त) इतका परतावा दिल्यानंतर तक्रारदाराने तक्रार मागे घेतली आहे.

(२) अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
तथापि नानावटी रुग्णालयात दाखल असलेल्या श्रीमती चांदणी इंदुलकर या महिलेचा मृत्यू दि. १३.०६.२०२० रोजी झाला होता. तथापि महिलेचा मृतदेह त्याच दिवशी नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

राज्यभरात कोविड तसेच इतर आजारांचे उपचार करण्याऱ्या खाजगी रुग्णालयांकडून विविध बाबींखाली अतिरीक्त रक्कम आकारल्याचे निदर्शनास आल्याने अतिरीक्त देयकाची रक्कम देयक लेखापरीक्षाअंती रुग्णांना परत देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
तसेच प्रश्न क्र. १ मध्ये नमूद प्रकरणांची चौकशी करण्यात येऊन संबंधित रूग्णास रू. ५.६० लाख रकमेचा परतावा देण्यात आलेला आहे. व त्यांनी तक्रार मागे घेतली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मध्यवर्ती हॉपिटल उल्हासनगर ३ येथे कोरोना संशयित रुग्ण आणि इतर रुग्णावर एकत्र उपचार होत असल्याबाबत

**(७) १२९७४ (१४-०९-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत, कसारा, शहापूर, मुरबाड, अंबरनाथ व बदलापूर तसेच इतर ग्रामीण
भागातून दररोज हजारो रुग्ण मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर - ३ येथे उपचारासाठी येत असून येथे संशयित रुग्ण आणि इतर रुग्णावर जनरल वॉर्ड मध्ये उपचार होत असल्यामुळे उल्हासनगर कोरोनाचा हॉटसॉप्ट ठरत असल्याचे दिनांक ३० जून, २०२० रोजी वा त्यासुमारास तसेच सदर रुग्णालयात व्हेंटीलेटर उपलब्ध नसल्याने अनेकांचा मृत्यू झाल्याचा आरोप एका राजकीय पक्षाने दिनांक ७ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्यवर्ती रुग्णालय येथे मोठ्या प्रमाणावर संसर्ग वाढण्याचा भीती व्यक्त केली जात असून हे टाळण्यासाठी आणि सर्व रुग्णांना उपचार मिळण्यासाठी वेगळे रुग्णालय आणि विशेष वॉर्डची गरज असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहरातील खासगी दवाखाने बंद असल्यामुळे मध्यवर्ती रुग्णालय येथे मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्यामुळे आणि येथील २१ वैदयकिय अधिकारी आणि कर्मचारी यांना कोरोनाची लागण झाल्यामुळे येथील इतर अधिका-यांवर अतिरीक्त कामाचा ताण पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मध्यवर्ती रुग्णालय येथे वैधकीय अधिकारी आणि कर्मचारी तसेच आरोग्य साधनसामुग्री कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्यामुळे तसेच येथील कर्मचारी यांची डयूटी दुसरीकडे लावल्यामुळे येथील रुग्णावर उपचार करण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, येथे कोरोनाच्या भीतीने व स्वाब अहवाल येईपर्यंत त्यांना योग्य उपचार मिळत नसल्याने रुग्ण दगावण्याचे प्रमाण वाढल्याचा आरोप लोकप्रतिनिधी कडून करण्यात येत असून कोरोना संशयित रुग्णाच्या स्वाब चाचणी अहवाल येण्याची वाट न पाहता कोणत्याही रुग्णालयात तातडीने उपचार व्हावेत अशी मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, मध्यवर्ती रुग्णालयात आरोग्य सुविधा व अतिरिक्त निधी उपलब्ध करणे याबाबत लोकप्रतिनीधीनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कायर्वाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२१-०१-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

कर्जत, कसारा, शहापूर, मुरबाड, अंबरनाथ व बदलापूर तसेच इतर ग्रामीण भागातून रुग्ण मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर-३ येथे येतात हे खरे आहे. मध्यवर्ती रुग्णालय हे मुख्यत्वे नॉन कोवीड रुग्णालय म्हणून कार्यरत आहे. तथापि या ठिकाणी कोवीड-१९ संशयित रुग्णांसाठी वेगळया वॉर्डची व्यवस्था करण्यात आली असल्यामुळे इतर रुग्ण व संशयित रुग्ण यांचा संपर्क येऊ नये याची खबरदारी घेण्यात येत आहे.

या रुग्णालयाबाबत कोणतीही लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

ही आवश्यकता लक्षात घेऊनच शासकीय प्रसुतीगृह, उल्हानगर-४ येथे कोवीड रुग्णालय स्थापन करण्यात आले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

मध्यवर्ती रुग्णालयातील विविध कक्षात कार्यरत असतांना माहे जुन २०२० या कालावधीत रुग्णालयातील एकूण १२ अधिकारी तसेच २० कर्मचारी यांना कोरोना संसर्गाची लागण झालेली असून त्यातील काही अधिकारी व कर्मचारी त्यांचे विलगीकरण कालावधी पूर्ण करून पुन्हा कर्तव्यार्थ हजर झालेले आहेत. तसेच त्यांच्या उपरोक्त कालावधीत उपलब्ध अधिकारी व कर्मचारी यांच्या मार्फत सेवा देण्यात येत आहेत.

(४) हे अंशत: खरे आहे.

मध्यवर्ती रुग्णालयातील ५ वैद्यकीय अधिकारी इतरत्र प्रतिनियुक्तीवर आहेत, तथापि त्यामुळे रुग्णसेवेत अडचणी निर्माण झालेल्या नाहीत.

(५) हे खरे नाही.

तथापि प्रत्येक संशयित रुग्णाला त्याच्या अहवालाची वाट न पाहता उपचार सुरू करण्यात येत आहेत.

(६) हे अशंत: खरे आहे.

मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर-३ येथे राष्ट्रीय आयुष अभियान कार्यक्रमांतर्गत स्वतंत्र आयुष्य कक्ष स्थापन करण्याबाबतची विनंती मा. मुख्यमंत्री यांना दिनांक ०२.०३.२०२० अन्वये केलेली आहे.

(७) याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत सूचित केले आहे.

---

**गोवेली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदाबाबत**

**(८) १४८१२ (१५-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवेली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या अंतर्गत ६५ गावे येत असून येथील डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या अपु-या संख्येमुळे रुग्णांची उपचारासाठी गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, रुग्णालय परिसरात अस्वच्छता पसरल्यामुळे रुग्णांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ग्रामीण रुग्णालयात तातडीने डॉक्टर व कर्मचा-यांची भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२७-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) वैद्यकीय अधिकारी गट-अ तीन पदे मंजूर असून तेथे एक नियमीत, एक कंत्राटी व एक बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. तसेच गट ड पदाच्या भरतीप्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यशासनाच्या वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय रुग्णालयात औषध पुरवठा करणाऱ्या कंपन्याची थकीत देयके अदा करण्याबाबत.**

**(९) २०३४१ (०८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यशासनाच्या आखत्यारातील असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी सलंग्न तसेच आरोग्य विभागाच्या रुग्णालयात शासनाच्या हफकीन संस्थेच्या मार्फत निविदा काढून पुरवठादार कंपन्याद्वारे औषध पुरवठा करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जानेवारी, २०२० दरम्यान निविदा काढून जवळपास १०० विविध औषध पुरवठादार कंपन्या मार्फत सुमारे २५० कोटी रुपयांची औषधे खरेदी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कोट्यावधी रुपयांची औषध खरीदी केल्यानंतर औषध पुरवठादार कंपन्यांना बिलाची रक्कम देण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० अखेर निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, औषध पुरवठादार कंपनीना थकीत देयक न दिल्यास ऑल इंडिया ड्रग अंड फूड लायसन्स होल्डर फौंडेशन च्या वतीने शासनाला औषधे पुरवठा करण्यात येणार नसल्याच्या इशारा दिनांक १२ नोव्हेंबर २०२० रोजी वा त्यासुमारास देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, औषध पुरवठादार कंपनीना थकीत देयक रक्कम न दिल्यास औषधे शासकीय रुग्णालय व आरोग्य केंद्रात उपलब्ध न झाल्यास राज्यातील गरीब रुग्णांना अडचणीला सामोरे जावे लागणार, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, औषध पुरवठादार कंपन्याची थकीत देयके अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२३-१२-२०२१) :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) होय.
(५) नाही. रुग्णांच्या आवश्यतेनुसार हाफकिन महामंडळ व संस्थास्तरावर औषधांची खरेदी करण्यात येत आहे.
(६) पुरवठादारांची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करुन घेऊन सदर देयके अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कांद्री, कन्हान (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथील वेकोलीच्या केअर सेंटर मध्ये डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे पाच रुग्णांचा झालेला मृत्यू**

**(१०) २७३६१ (१५-०६-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कांद्री, कन्हान (ता.पारशिवनी, जि.नागपूर) येथील वेकोलीच्या जवाहरलाल नेहरु हॉस्पीटल मधील कोविड केअर सेंटर मध्ये डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे पाच रुग्णांचा होरपळुन मृत्यू झाल्याची बाब दिनांक १४ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोविड केअर सेंटर मध्ये प्रशिक्षित डॉक्टर उपलब्ध नसल्याने या रुग्णांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णांना ऑक्सिजनची गरज असताना आवश्यक त्या प्रमाणात ऑक्सिजन पुरवठा करण्याचे डॉक्टरांना समजले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर कोविड केअर सेंटर व तेथील दोषी असणाऱ्या डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२७-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.
वेकोलीच्या केअर सेंटरमध्ये मरण पावलेले पाच रुग्ण डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे होरपळून मरण पावलेले नाहीत.

(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालात रुग्णांची प्रकृती अतिशय गंभीर स्वरुपाची होती, रुग्णांना व्हेंटिलेटरची गरज होती. त्याबाबत रुग्णांच्या नातेवाईकांना त्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. रुग्णांना इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे संदर्भित केले होते. परंतु तेथे एकही बेड उपलब्ध नसल्याने रुग्णांना कोव्हिड केअर सेंटर मधुन हलविता आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कोरोनाची तिसरी लाट रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(११) २७७७० (१६-०६-२०२१). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनाची तिसरी लाट आली तर त्याचा मोठ्या प्रमाणात बालकांना संसर्ग होण्याचा इशारा आरोग्य तज्ञांनी दिला असल्याने शासनाने बालरोग तज्ञाचे कृती दल स्थापन करण्याचे दिनांक ८ मे, २०२१ रोजी वा त्या सुमारास जाहीर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पार्श्वभूमीवर आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने राज्यभरातील कृतीदलातील बालरोग तज्ञ व डॉक्टर यांच्या बरोबर मा.मुख्यमंत्री यांनी माहे मे, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान बैठक घेतली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बैठकीत कोरोनाबाधीत बालकांवरील उपचारासाठी कोणती सुरक्षात्मक उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्याचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, लहान मुंलाकरिता स्वतंत्र बेड, ऑक्सिजन, व्हेंटिलेटर चे नियोजन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२१-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
कोवीड १९ संसर्गाचा लहान मुलांमध्ये होणाऱ्या प्रादुर्भावापासून प्रतिबंधात्मक उपाययोजना व उपचार पध्दती यावर मार्गदर्शन करण्यासाठी दिनांक २५.०५.२०२१ अन्वये बालरोग तज्ञांचा विशेष कार्यदल (टास्क फोर्स) स्थापन करण्यात आलेला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) राज्यामध्ये कोरोनाची तिसरी लाटेच्या नियंत्रणासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत-

कोवीड रुग्ण व्यवस्थापनासाठी केलेल्या त्रिस्तरीय आरोग्य यंत्रणेमध्ये ऑक्सीजन व्यवस्थापन व खाटांचे नियोजन करण्यात आले आहे तसेच अतिरिक्त ऑक्सीजन व औषधी साठा करण्याबाबत निर्णय घेऊन त्यानुसार कार्यवाही सुरू केली आहे.

सौम्य, मध्यम आणि गंभीर स्वरूपाच्या कोविड रूग्णांवर उपचार करणाऱ्या त्रिस्तरीय आरोग्य यंत्रणेमधील मनुष्यबळ व सुविधा उपलब्धतेबाबत सुक्ष्म नियोजन करण्यात आलेले आहे.

(४) लहान मुलांकरीता खालीलप्रमाणे खाटा आरक्षित करण्यात आल्या आहेत.

- समर्पित कोविड रूग्णालयांमध्ये (डी.सी.एच.) ५% ऑक्सीजन व व्हेंटीलेटर खाटा
- समर्पित कोविड आरोग्य केंद्रांमध्ये (डी.सी.एच.सी.) १०% ऑक्सीजन व सर्वसाधारण खाटा.
- समर्पित कोविड निगा केंद्रांमध्ये (सी.सी.सी.) १५% सर्वसाधारण खाटा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर शहरातील गांधी चौक येथील शासकीय सुपरस्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये व्हेंटीलेटर बंद पडल्यामुळे रुग्णांचा झालेला मृत्यू

**(१२) २८८९२ (१५-०६-२०२१). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहरातील गांधी चौक येथील शासकीय सुपरस्पेशालिटी हॉस्पीटलधील तिस-या मजल्यावरील आय.सी.यू. विभागात दिनांक २० मार्च, २०२१ रोजी रात्रौ ९.३० च्या सुमारास अचानक वीज पुरवठा खंडीत झाल्याने व्हेंटीलेटर बंद पडल्यामुळे चार कोव्हिड रूग्णांचा मृत्यु झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने ज्या कोव्हिड रूग्णांचा मृत्यू होतो त्यांची नोंद योग्य रितीने घेतली जाते काय, जर नोंद योग्यरित्या घेतली जात असेल तर दिनांक १८ एप्रिल, २०२१ रोजीच्या अहवालात अचानक ५० कोव्हिड रूग्णांच्या मृत्यूची नोंद दाखवण्यात आली असून यामध्ये दिनांक १८ एप्रिल, १७ एप्रिल, व १६ एप्रिल, २०२१ रोजीच्या मृत्यूची नोंद जाहीर करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशासनाकडून मृत्यूचा आकडा लपविण्यात येतो काय,

(४) तसेच, लातूर येथील कोव्हिड सेंटर मध्ये मुदतबाहय औषधांचा पुरवठा झाला असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबतची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०५-०१-२०२२) :**(१) हे खरे नाही
(२) विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर येथे दिनांक १६, १७ व १८ एप्रिल, २०२१ रोजी अनुक्रमे १६, १७, व १७ कोविड पॉझीटीव्ह रुग्णांचा मृत्यू झालेला आहे
(३) नाही
(४) हे खरे नाही
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यात स्थूल बालकांच्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत**

**(१३) ३२२६४ (०५-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुंबई, नागपूर, अन्य महानगरात दिवसेंदिवस बालके स्थूल होण्याचे प्रमाण वाढत असल्याची बाब राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणातून (Natiomal Family Health survey) निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने यावर कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२४-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) राष्ट्रीय कुटूंब आरोग्य सर्वेक्षणानुसार (National Family Health survey) स्थूल बालकांचे प्रमाण पुढीलप्रमाणे आहे :-

| क्षेत्र | NFHS-५ (२०१९-२०) | NFHS-४ (२०१५-१६) |
|---|---|---|
| मुंबई | ६.१ | ४.४ |
| नागपूर | १०.१ | १.० |
| उर्वरित महाराष्ट्र | ४.१ | १.९ |

(३) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत ० ते ६ वयोगटातील अंगणवाडी जाणा-या बालकांची वर्षातून दोनदा आणि ०६ ते १८ वर्षे वयोगटातील शाळेत जाणाऱ्या बालकांची वर्षातून एकदा तपासणी करण्यात येते. सदर कार्यक्रमांतर्गत बालकांचे वजन व उंची घेण्यात आल्यानंतर त्यांना पोषण शिक्षण (Nutritional Education), समतोल व पोषण आहार, व्यायामाचे महत्व, आरोग्य शिक्षण इ. बाबत मार्गदर्शन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आरोग्य विभागाच्या पाच हजार जागांच्या पदभरती परीक्षेत झालेल्या गोंधळामुळे सदरची परीक्षा रद्द करून एमपीएससीमार्फत घेण्याबाबत

**(१४) ३२३०७ (०२-०९-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात फेब्रुवारीच्या अंतिम आठवड्यात घेण्यात आलेल्या आरोग्य विभागाच्या पाच हजार जागांच्या पदभरती परीक्षेमध्ये औरंगाबाद आणि नागपूर येथे प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वी फुटण्याचे तसेच कोकण येथील परीक्षा केंद्र उशिरा उघडल्याचे प्रकार निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिकमध्ये सीएमसीएस महाविद्यालयातील परीक्षा केंद्रांवर एक हजार ९०० परीक्षार्थी असताना केवळ हजार उमेदवारांच्या बसण्याची सोय करण्यात आली असून एका बाकावर दोन उमेदवार बसविल्याचे बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाआयटीमार्फत नेमलेल्या आयटी कंपनीकडून राज्यभरात परीक्षा घेताना विदर्भ मराठवाड्यातील उमेदवारांना पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील परीक्षा केंद्र देण्यात आल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर परीक्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर इंटरनेटचा वापर करून उत्तरे लिहिणे तसेच सामुहिक कॉपी करण्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर परीक्षा रद्द करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२२) :** (१) प्राप्त अहवालानुसार अंशत: खरे आहे.

१.औरंगाबाद येथील एका परिक्षा केंद्रावर एका उमेदवाराने प्रश्नपत्रिका स्कॅन करून बाहेर प्रसारित करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांच्या प्रयत्नामुळे परिक्ष केंद्राबाहेर परिक्षा सुरू होण्यापूर्वीच सदर उमेदवारास अटकाव करण्यात आलेला आहे. याबाबत पोलिस अधिक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांचेमार्फत अधिक तपास सुरू आहे.

(२) परिक्षा केंद्र क्र.४५५ एन के वराडकर आर्टस ॲन्ड आर व्ही बेलोसे कॉमर्स कॉलेज, दापोली रत्नागिरी येथे शारीरिक अंतर व्यवस्था नसल्यामुळे परिक्षा सुरू करण्यास उशीर झाला परिक्षा सुरळीत पार पडली.

(३) रत्नागिरी येथील परिक्षा केंद्र क्र.४५७ आर आरवैद्य इंग्लिश मिडीअम स्कुल दापोली येथे विहित वेळेत परिक्ष सुरू झाली नव्हती. विभागाचे अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांनी उमेदवारांना विश्वासात घेऊन ठीक ११.३० वाजता परिक्षा सुरू करून दु.१.३० वाजता परिक्षा समाप्त करण्यात आली आहे. तसेच औरंगाबाद येथील एका केंद्रावर दुपारच्या सत्रातील प्रश्नपत्रिका सर्वच परिक्षा केंद्रावर निर्धारित वेळेनंतर एक ते सव्वा तास विलंबाने प्राप्त झाल्यानंतर सर्व परिक्षार्थीना निर्धारित वेळ देवून परिक्षा प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यात आली.

२) प्राप्त अहवालानुसार हे अंशत: खरे आहे.
नाशिक येथील एमव्हीपी समाज सीएमएससीएस कॉलेजमध्ये शारीरिक अंतर व्यवस्था नसल्यामुळे उमेदवारांचा आक्षेप होता, पोलिसांच्या समन्वयाने परिक्षा सुरळीत पार पडली.
३) प्राप्त अहवालानुसार हे अंशत: खरे आहे. परिक्षा एकाच दिवशी दोन सत्रात घेण्यात आली. उमेदवारांनी ज्या कार्यालयाच्या पदाकरिता अर्ज केले आहे, त्याच कार्यालयाच्या मंडळाकडील जिल्हयामध्ये परिक्षा केंद्र देण्या आले होते.
(४) प्राप्त अहवालानुसार हे खरे नाही.
प्रत्येक पदाच्या प्रश्नपत्रिका ए,बी,सी व डी या चार सेटमध्ये असल्यामुळे व एका बाकावर एक उमेदवार अशी बैठक व्यवस्था असल्यामुळे सामुहिक कॉपी करण्याच्या घटना निदर्शनास आलेल्या नाही.
(५) प्राप्त अहवालानुसार गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत, सबब प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी प्रयोगशाळामधून रॅपीड व अंटीजेन / आरटीपीसीआर चाचणीकरिता आकारण्यात येणाऱ्या वाढीव दरांबाबत**

**(१५) ३२३५७ (०५-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतीय आयुर्विज्ञान संस्था आणि एन.ए.बी.एल. मान्यताप्राप्त खासगी प्रयोगशाळांना आरटीपीसीआर तपासणीचे दर ठरवून देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात आरटीपीसीआर कोरोना चाचणीचे दर नियंत्रणात आणण्याकरिता चाचणीच्या दरात कपात केली असतानाही पुणे जिल्ह्यातील व पिंपरी-चिंचवड शहरातील काही पॅथॉलॉजी लॅबमध्ये २२०० ते ४००० रुपये नागरिकांकडून आकारत असल्याचे निदर्शनास आले असून ठरवून दिलेल्या दराप्रमाणे दर आकारावेत व जादा दर आकारण्या-या प्रयोग शाळांवर साथ रोग अधिनियम १८९७ नुसार कारवाई करण्याचा इशारा महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या मार्फत देण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आरटीपीसीआर चाचणी करिता संकलन केंद्रावर गेल्यास पाचशे रुपये , कोविड सेंटर व रुग्णालये येथे नमुने दिल्यास सहाशे रुपये व नागरिकांच्या घरी जाऊन नमुने घेतल्यास आठशे रुपये असा दर तपासणीसाठी ठरवून देण्यात आला असून रॅपीड / अंटीजन तपासणी करता १५० ते ३०० रुपये दर निश्चित करण्यात आला असतानाही अनेक प्रयोग शाळा पाचशे ते आठशे रुपये इतका दर आकारत असल्याचे देखिल निदर्शनास आले,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाढीव दर आकारणी करणाऱ्या पिंपरी-चिंचवड व पुणे शहरातील प्रयोगशाळांवर साथ रोग अधिनियम १८९७ नुसार कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, वाढीव दर आकारणी करणाऱ्या पिंपरी-चिंचवड व पुणे शहरातील प्रयोगशाळांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६.) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२१-०१-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

या संदर्भात कृष्णा डायग्नोस्टिक, प्रा.लि. चिंचवड, पुणे यांचे बाबत पुणे महानगरपालिकेकडे तक्रार प्राप्त झाली होती. या संदर्भात आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका यांनी संबंधित प्रयोगशाळेस कारणे दाखवा नोटिस देण्यात आलेली होती.

(३) हे अंशत: खरे आहे.

याबाबत एक तक्रार प्राप्त आहे.

(४) हे खरे आहे.

(५) या संदर्भात आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका यांनी संबंधित प्रयोगशाळेस कारणे दाखवा नोटिस देण्यात आलेली आहे. या प्रयोगशाळेने दिलेल्या कारणे दाखवा नोटिसीचे उत्तर दिले असून सदर लॅबने शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अंमलबजावणी सुरू केली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कारंजा (जि. वाशीम) येथील उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१६) ३२४१२ (१२-०८-२०२१). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारंजा (जि. वाशीम) येथील उपजिल्हा रुग्णालयात एकूण मंजूर ७५ पदे पैकी ३६ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे किती दिवसात भरण्यात येणार आहेत,

(३) असल्सास सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्राप्त अहवालानुसार वर्ग १ ते ४ चा रिक्त पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| वर्ग१ | १५ | ०८ | ०७ |
| वर्ग२ | | | |
| वर्ग३ | ५२ | २५ | २७ |
| वर्ग४ | ०८ | ०६ | ०२ |

प्राप्त अहवालानुसार वर्ग १ ते २ रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही आयुक्तालयामार्फत शासनस्तरावर सुरू आहे. तसेच, वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील रिक्त पदांसाठी अनुक्रमे दि.२४.१०.२०२१ व दि.३१.१०.२०२१ रोजी लेखी परिक्षा घेण्यात आलेली आहे.

(३) वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील रिक्त पदांसाठी अनुक्रमे दि.२४.१०.२०२१ व दि.३१.१०.२०२१ रोजी लेखी परिक्षा घेण्यात आली आहे.
(४) गट ड च्या लेखी परीक्षेचा पेपर फुटल्याने या प्रकरणी दाखल झालेल्या गुन्हयात पोलीस तपास सुरू आहे. पोलीस तपासाअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**वाशिम जिल्हयातील सामान्य रुग्णालयात राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांना मानधन मिळणेबाबत**

**(१७) ३२४१६ (३०-०८-२०२१). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशिम जिल्हयातील सामान्य रुग्णालयात राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचाऱ्यांना गेल्या दोन महिन्यापासून मानधन मिळाले नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याची बाब दिनांक ०९ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असल्यास, सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना मानधन देणेबाबत जिल्हा सामान्य रुग्णालय अथवा प्रशासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात
येत आहे,
(३) असल्यास, प्रशासनामार्फत या कंत्राटी कर्मचाऱ्यांना मानधन केव्हा पर्यंत देण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२२) :** (१) वाशिम जिल्हयातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या ४८५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी २३३ कर्मचा-यांचे पुनर्विलोकन अहवाल व करारनामे वेळेवर सादर केले नसल्यामुळे त्यांचे माहे जून व जुलै २०२१ या दोन महिन्यांचे मानधन अदा करण्यात आलेले नव्हते, ही बाब खरी आहे.
(२) सदर २३३ कंत्राटी कर्मचा-यांचे पुनर्विलोकन अहवाल व करारनामे जिल्हा सामान्य रुग्णालयाकडून प्राप्त झाल्यावर दिनांक १७.०८.२०२१ रोजी त्यांचे मानधन अदा करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धुळे शहरातील जुन्या जिल्हा रुग्णालयात ३०० खाटांचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत.**

**(१८) ३२५५२ (०७-०१-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या जुन्या जिल्हा रुग्णालयात ३०० खाटांचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास कधीपर्यंत मंजूरी देण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२३-०२-२०२२) :** (१) नाही,हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**किनवट व माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील शासकीय रुग्णवाहिकांमध्ये ऑक्सिजनची सोय नसल्याबाबत**

**(१९) ३२५९९ (०७-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट व माहूर (जि.नांदेड) तालुक्यास शासनाने दिलेल्या ११ रुग्णवाहिकांमध्ये ऑक्सिजनची सोय नसल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदरील रुग्णवाहिकांना तातडीने ऑक्सिजनची सोय उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२३-०२-२०२२) :** (१) व (२) किनवट व माहूर तालुक्यातील एकूण १४ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहेत. किनवट व माहूर तालुक्यात कार्यरत असलेल्या १४ प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिका हया जुन्या झाल्याने माहे मे-जून २०२१ मध्ये सदरील १४ प्राथमिक आरेग्य केंद्रांना पेशंट ट्रान्सपोर्ट ॲम्ब्ल्युन्स टाईप बी प्रकारच्या नवीन रुग्णवाहिका पुरविण्यात आल्या आहेत.
आपतकालीन परिस्थितीत रुग्णास आवश्यकता असल्यास रुग्णवाहिकेत ऑक्सिजन सिलेंडर या बी टाईप रुग्णवाहिकेमध्ये ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात कोरोनामुळे होण्यारे मृत्यू आटोक्यात आणण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(२०) ३२७१० (०७-०१-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील एकूण कोरोना बाधितांच्या मृत्यू पैकी ४० टक्के मृत्यू महाराष्ट्रात झाले असून कोरोना बाधित रुग्ण संख्येच्या बाबतीत देशांतील प्रमुख ३० जिल्हयांमध्ये महाराष्ट्रातील १५ जिल्हयांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयातील कोविड विभागातील रुग्णांचा मृत्यूदर देशभरात सर्वाधिक असून राज्यात कोवीड विषाणूचा संसर्ग सुरु झाल्यापासून ते दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० या कालावधी दरम्यान या रुग्णालयातील कोविड विभागात १५०० रुग्णांचा मृत्यू झाला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरातील इतर खासगी रुग्णालयांच्या तुलनेत ससून रुग्णालयातील कोविड विभागात सर्वाधिक कोविड रुग्ण मृत पावले याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, कोरोनाचा वाढता प्रादूर्भाव रोखण्यासाठी कोरोना चाचण्या व कारोना बाधिताच्या संपर्कात येणा-या व्यक्तीच्या चाचण्या करण्याच्या संख्येत वाढ करण्याबाबत तसेच महाराष्ट्राचा मृत्यूदर देशाच्या सरासरी मृत्यू दरापेक्षा अधिक असल्यामुळे मृत्युदर कमी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
देशातील एकूण कोरोना बाधितांच्या मृत्युपैकी ३० टक्के मृत्यु महाराष्ट्रात झाले असून कोरोना बाधित रूग्ण संख्येच्या बाबतीत देशातील प्रमुख ३० जिल्ह्यामध्ये महाराष्ट्रातील या १० जिल्ह्याचा समावेश आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
तथापि या रूग्णालयाचा मृत्युदर देशात सर्वाधिक असल्याबाबत अधिकृत माहिती नाही.
ससून रूग्णालय येथील कोविड विभागात ऑक्टोबर २०२० पर्यंत एकूण ६८९७ रूग्ण दाखल झाले होते व १५८१ कोरोना बाधित रूग्णाचा मृत्यु झाला होता.
(३) होय,
या मृत्युचे तज्ञ समिती मार्फत नियमितपणे डेथ ऑडिट करण्यात येते. त्यानुसार खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.
१. ससून सर्वोपचार रूग्णालय हे पुणे जिल्ह्यातील महत्वाचे शासकीय टर्शरी केअर सेंटर असल्याने येथे जिल्ह्यातील ग्रामीण भागातून तसेच पुणे शहरातील खाजगी रूग्णालयातून मोठ्या संख्येने रूग्ण गंभीर व आजाराच्या शेवटच्या टप्प्यात अत्यवस्थ अवस्थेत पाठविण्यात येत असतात.
२. मृत १५८१ कोरोना बाधीत रूग्णापैकी ४१८ (सुमारे २६ टक्के) रूग्ण हे इतर रूग्णालयांकडून गंभीर/अतिगंभीर अवस्थेत ससून रूग्णालयात पाठविण्यात आलेले होते.
३. १३५ (सुमारे ९ टक्के) रूग्ण मयत झालेल्या अवस्थेत पाठविण्यात आलेले होते.
४. बहुतांशी कोरोना बाधित रूग्ण हे मधुमेह, उच्च रक्तदाब, किडनीचे आजार ह्रदयांचे विकार अशा गंभीर आजारांनी ग्रस्त असल्याने कोविड बाधित मृतांच्या संख्येत भर पडल्याचे दिसून येते.
(४) कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरीता कोरोना चाचण्यांची संख्या वाढविण्यात आली होती. तसेच कोरोना बाधित रूग्णांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींच्या देखील कोरोना चाचण्यांची संख्या ही वाढविण्यात आलेल्या होत्या. प्रादुर्भाव वाढू नये व रूग्णांना विलगीकरणामध्ये ठेवून उपचार मिळावे या करीता कोविड केंद्रातील खाटांची संख्या टप्प्याटप्प्याने वाढविण्यात आली. ससून रूग्णालयात ऑक्टोबर २०२० पर्यंत करण्यात आलेल्या एकूण कोरोना चाचण्यांची संख्या १०१६३६ इतकी आहे.
कोरोना बाधित रूग्णांच्या उपचाराकरीता व कोरोना बाधित रूग्णांचा मृत्युदर कमी

करण्याकरीता ससून सर्वोपचार रूग्णालयांच्या आवारातील नवीन अकरा मजली इमारतीमधील कोविड केंद्र अत्यंत तत्परतेने व अल्पावधीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मदतीने कार्यान्वीत करण्यात आले. सदरचे कामकाज लॉकडाउनच्या अत्यंत कठीण काळात युद्धपातळीवर यशस्वीरीत्या पुर्ण करण्यात आले व तद्नंतर ससून रूग्णालयातील खाटांची संख्या टप्प्याटप्प्याने वाढवून ६० वरून आज रोजीपर्यंत एकूण खाट संख्या ८५५ इतकी वाढविण्यात आली आहे. तसेच कोविड अतिदक्षता विभागातील खाटांची संख्या देखील ६ वरून १२८ पर्यंत वाढविण्यात आली आहे व सर्व खाटांना ऑक्सीजन पुरवठ्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच व्हेंटीलेटर्सची संख्या ६ वरून १०० इतकी वाढविण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तामिळनाडू मेडीकल सर्व्हीसेस कार्पोरेशनच्या धर्तीवर महाराष्ट्रात स्वतंत्र औषध खरेदी महामंडळ उभारण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२१) ३२७८२ (०७-०१-२०२२). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तामिळनाडू मेडीकल सर्व्हीसेस कार्पोरेशनच्या धर्तीवर महाराष्ट्रात स्वतंत्र औषधे खरेदी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.आरोग्य मंत्री यांनी माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान तामिळनाडू राज्याचा दौरा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अभ्यास दौऱ्यानंतर औषधे खरेदी व आरोग्यविषयक बाबीसंदर्भात तामिळनाडू राज्याच्या मेडीकल सर्व्हिसेस कॉर्पोरेशनच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र महामंडळ निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर मांडणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी प्रसार माध्यमाद्वारे जाहिर केले असल्याचे दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व सदर प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर ठेवण्यात आला आहे काय, असल्यास, त्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने पूढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२३-०२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि. १३.०९.२०२१ ते दि. १४.०९.२०२१ या कालावधीत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासकीय अधिकाऱ्यांसोबत तामिळनाडू राज्यातील आरोग्य विषयक योजना व औषधी खरेदी इत्यादी संदर्भात शासकीय अभ्यास दौरा केला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

याबाबत दिनांक २२ सप्टेंबर, २०२१ रोजी दैनिक लोकमत वृतपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती.

(४) प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर चालु आहे. सदर प्रस्ताव अद्याप मंत्रीमंडळासमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला नाही.

(५) या बाबतचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर चालू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामपंचायती करिता राज्य व केंद्र शासनाच्या माध्यमातून मिळणारा विकास निधी अखर्चित ठेवल्याबाबत

**(२२) ३३०९४ (०६-०१-२०२२). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील ग्रामपंचायती करिता राज्य व केंद्र शासनाच्या माध्यमातून मिळणारा १४ वित्त आयोग, ५ टक्के, १० टक्के, व १५ टक्के राखीव विकास निधी अखर्चित असल्याचे मा. सभापती, भिवंडी यांनी मा.गट विकास अधिकारी यांना पत्र देऊन निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे दुगाड (ता. भिवंडी) ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी यांनी १४ वित्त निधीतील रुपये १४ लक्ष निधी परस्पर धनादेश न देता रोखीने खर्च केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालया समोर आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ५ टक्के, १० टक्के, व १५ टक्के राखीव विकास निधी अखर्चित ठेवणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) दुगाड ग्रामपंचायत कार्यालयासमोर दिनांक.२४.९.२०२१ रोजी ग्रामस्थांनी जन आंदोलन केले हे खरे आहे.

(४) होय, यासंदर्भात ग्रामसेवक दुगाड श्रीमती. हर्षदा अशोक गुळवी यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचेविरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेहकर (जि. बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२३) ३३३६३ (१०-०१-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर (जि. बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकिय अधिक्षकांसह एकूण १७ पदे रिक्त असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार सदरची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२२-०२-२०२२) :**(१) हे खरे नाही,
ग्रामीण रुग्णालयाच्या आकृतीबंधानुसार ग्रामीण रुग्णालय मेहकर, जिल्हा बुलढाणा येथील आस्थापनेवर एकूण २८ पदे मंजूर असुन, वैद्यकीय अधिकक्षकांसह एकूण २४ पदे भरण्यात आलेली आहेत.
(२) व (३) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील रेशनकार्ड नसलेल्या कुटुंबांना उस्मानाबाद जिल्हा परिषद उस्मानाबाद च्या स्वयसंपादित उत्पन्न (सेस) निधीतून अन्न धान्य उपलब्ध करुन देण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२४) ३३७१९ (१२-०१-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना महामारीच्या काळातील लॉकडाऊनमुळे अनेक कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयामध्ये रेशनकार्ड नसलेल्या कुटुंबियांवर देखील लॉकडाऊन दरम्यान उपासमार होत असल्याने रेशनकार्ड नसलेल्या कुटुंबियांना उस्मानाबाद जिल्हा परिषदेने जिल्हा परिषद स्वयसंपादित उत्पन्न (सेस) निधीतुन अन्न धान्याचे मोफत किट वाटप करण्याचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., उस्मानाबाद यानी पूढील मंजुरीसाठी दि. १६ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास यांच्याकडे पाठविला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रस्ताव मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या मंजूरीसाठी दि. २२ एप्रिल, २०२० रोजी पाठविण्यात येऊन सदर प्रस्तावास तात्काळ मंजूरी मिळण्याची विनंती लोकप्रतिनिधी यांनी लेखी पत्राद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त निवेदनानुसार शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०३-२०२२) :**(१) अध्यक्ष, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी त्यांच्या दि.१३/०४/२०२० अन्वये जि.प. प्रशासनास ग्रामीण भागातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकावर उपासमारीची वेळ आल्याबाबत पत्र दिलेले आहे.
(२) हे खरे आहे.

(३) व (४) याबाबतचा दि.१६/०४/२०२० चा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. उस्मानाबाद यांचा प्रस्ताव ग्रामविकास विभागास प्राप्त होऊन सदर प्रस्ताव ग्रामविकास विभागाच्या दि.१५/०५/२०२० रोजीच्या पत्रान्वये अमान्य करण्यात आलेला आहे. तसेच, गरजूंना मोफत अन्नधान्य कीट पुरवठ्याबाबत आवश्यकता भासत असेल तर, याबाबत जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचेशी संपर्क साधण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. उस्मानाबाद यांना सदर पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भडगांव तालुक्यातील (जि. जळगांव) गुढे येथील चौदाव्या वित्त आयोगातील भ्रष्टाचाराच्या तक्रारीतील संबंधीतांवर कारवाई करण्याबाबत**

**(२५) ३३७७८ (०६-०१-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भडगांव तालुक्यातील (जि. जळगांव) गुढे येथील चौदाव्या वित्त आयोगातील भ्रष्टाचाराच्या तक्रारीतील पाने गहाळ झाल्याचे सांगणारे ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बोटे, टी.पी.मोर यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी अन्यथा आत्मदहन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी सीईओ डॉ. पंकज आशिया यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे दिला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून उक्त परिस्थितीची पाहणी करण्यात आली आहे काय व पाहणीच्या अनुषंगाने काय निदर्शनास आले तसेच चौदाव्या वित्त आयोगातील भ्रष्टाचाराच्या तक्रारीतील संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे, तक्रारदार श्री. जुलाल पाटील व श्री शशिकांत देवचंद महाजन रा.गुढे, ता. भडगाव यांनी दि.९.८.२०२१ रोजी सदर बाबत तक्रार अर्ज दिलेला आहे.
(२) तक्रारदार यांनी मौ. गुढे ता. भडगांव येथील ग्रा.प. सरपंच, तत्का उपसरपंच, तत्का सचिव यांचे विरुध्द केलेली भ्रष्टाचार बाबत तक्रार अर्ज प्राप्त दि. १८/०३/२०२० नुसार चौकशी प्रस्तावित करणेत आलेली होती. १) उपमुख्यकार्यकारी अधिकारी (साप्रवि) २) उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी ३) उपअभियंता बांधकाम विभाग ४) गट विकास अधिकारी पं.स भडगांव ५) सहा. गट विकास अधिकारी पं.स भडगांव ६) विस्तार अधिकारी (ग्राप) पं.स. पाचोरा यांची समिती सदस्य म्हणुन नेमणुक करुन प्रत्यक्ष भेट देऊन उपलब्ध दप्तर तपासणी करुन सखोल चौकशी करणे बाबत समिती स्थापित करणेत आलेली होती.
सदर समितीने अहवाल दिनांक १५/०७/२०२१ रोजी सादर केलेला आहे. सदर अहवालात अनियमितता/अपहार/नियमबाहय खर्च असल्याचे निदर्शनास आल्याने तत्कालीन सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीसी देण्यात आलेला होती. सदर अनुषंगाने

त्यांनी खुलासे सादर केलेले असुन सदर नुसार संबधीत दोषी विरुध्द ग्राम पंचायत अधिनियम १९५८ व महा.ग्रा.प लेखा संहिता २०११ व जि.प.जि.से (शिस्त व अपिल) नियम १९६४ नुसार कारवाई करणे बाबत गट विकास अधिकारी पं.स भडगांव यांना आदेशीत करणेत आलेले आहे. सदर कारवाई सुरु आहे.

(३) नियमानुसार कारवाई सुरु असल्याने विलंब नाही.

---

**देवणी (जि.लातूर) येथे ट्रॉमा केअर सेंटर व नर्सिंग कॉलेज करणेबाबत**

**(२६) ३४०२१ (१०-०१-२०२२). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवणी (जि.लातूर) हा तालुका निलंगा मतदार संघातील सिमावर्ती भागातील असून या तालुक्यातून राष्ट्रीय महामार्ग सुध्दा गेलेला असल्याने या ठिकाणी आरोग्याच्या सुविधा तात्काळ उपलब्ध होणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवणी शहरात ग्रामिण रूग्णालय असून शहराच्या जवळपास प्राथमिक आरोग्य केंद्रासह विविध आरोग्य उपकेंद्रे सुध्दा सुरू असून देवणी येथे सक्षम आरोग्य सुविधासह ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्याबाबत मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, कोरोनाच्या संसर्गाच्या काळात कुशल आरोग्य कर्मचारी कमतरता भासत असल्यामुळेच या ठिकाणी नव्याने नर्सिंग कॉलेज सुरू करावे अशी मागणी होत असून देखिल आरोग्य विभागाने यास मान्यता देण्याबाबत कोणताच निर्णय घेतलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासाठी या ठिकाणी ट्रॉमा केअर सेंटर व नव्याने नर्सिंग कॉलेज सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे

**श्री. राजेश टोपे (२३-०२-२०२२) :** (१) व (२) देवणी तालुक्यात सद्यस्थितीत ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रे सुरु आहेत. त्याद्वारे आरोग्य सेवा देण्यात येतात.

(३) व (४) देवणी (जि.लातूर) येथे ट्रामा केअर सेंटर व नर्सिंग कॉलेज स्थापना करणे निकषात बसत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हयासाठी विकास प्रकल्पाची घोषणा करणेबाबत**

**(२७) ३४०२५ (०५-०१-२०२२). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त आयोजित केलेल्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाच्या वेळी मराठवाडयातील जिल्हयाकरीता नविन विकास कामांची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी औरंगाबाद (संभाजीनगर) येथे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयातील जिल्हयाकरीता नविन विकास प्रकल्पाची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी केली असेल तर त्यामध्ये लातूर जिल्हयाचा विकास प्रकल्पाचा उल्लेख केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडयातील जिल्हयासाठी विकास प्रकल्पाची घोषणा करणेकरीता मा.मुख्यमंत्री यांना विभागीय आयुक्त, औरंगाबाद (संभाजीनगर) यांनी मराठवाडयातील जिल्हाधिकारी यांच्याकडून घोषणा करण्यास शक्य असलेल्या विकास कामांची यादी मागवली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामध्ये लातूरचा विकास कामाचा समावेश होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विभागीय आयुक्तांनी मागविलेल्या विकास कामांच्या यादीमध्ये लातूर जिल्हयातील विविध महत्वाच्या ६ विकास कामांची यादी प्राप्त झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) नसल्यास, लातूर जिल्ह्यातील विकास प्रकल्पाच्या घोषणेची यादी न मांडण्याचे कारण काय आहेत?

**श्री. अजित पवार (०२-०३-२०२२) :** (१) होय.

(२) हे खरे नाही. मा. मुख्यमंत्री यांनी "लातूर जिल्ह्यातील टेंभी येथे सौरउर्जा प्रकल्प उभारणे" याविषयी घोषणा केली आहे.

(३), (४) (५) होय.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर तालुक्यातील मासवण प्राथमिक आरोग्य केंद्राला जोडणाऱ्या रस्त्याच्या दुरावस्थेबाबत

**(२८) ३४११० (०६-०१-२०२२). श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर तालुक्यातील मासवण प्राथमिक आरोग्य केंद्राला जोडणाऱ्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांना त्रास होत असून सदरहू रस्ता दुरुस्त करुन देण्याच्या मागणीचे निवेदन स्थानिक नागरीकांनी माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्या सुमारास जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात देण्यात आले, आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीअंती काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, उक्त निवदेनाच्या अनुषंगाने शासनाकडून सदरहू रस्ता दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर रस्ता अवर्गिकृत असून या रस्त्याची लांबी ६८०.०० मीटर आहे.

(३) व (४) मासवण आरोग्य केंद्राला जोडणारा रस्ता अवर्गिकृत आहे. तथापि, सदर अवर्गिकृत रस्त्याचे काम आमदार निधी, खासदार निधी, जिल्हा वार्षिक आदिवासी उप योजना, जिल्हा परिषद स्व उत्पन तसेच अवर्गिकृत रस्त्यांसाठी असलेल्या इतर योजना यासारख्या योजनांमधून हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**मुबंईतील मुलुंड (पश्चिम) राज्य कामगार विमा योजना हॉस्पीटल आवारात शौचालय बांधून देण्याबाबत**

**(२९) ३४२६४ (१०-०१-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुबंईतील मुलुंड (पश्चिम) येथील राज्य कामगार विमा योजना रुग्णालयाच्या आवारातील सार्वजनिक विभाग कार्यालय (पी.डब्लू.डी.) चाळीतील १६ कुटुंबीयांनी स्थानिक लोकप्रतिनिधीच्या मार्फत शौचालय बांधून मिळण्याची मागणी केली होती, हे खर आहे,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२२-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि.११.०६.२०२१ अन्वये रा.का.वि.यो.रुग्णालय, मुलुंड च्या आवारातील सा.बां.वि. चाळीतील १६ कुटुंबियांसाठी स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालय बांधून देण्यास परवानगी देण्याबाबत सहकार्य करण्यासाठी विनंती करण्यात आली आहे.

तथापि, सदरहू चाळ अनाधिकृत बांधकाम असल्याचे निर्दशनास आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात रक्त साठा वाया जाऊ नये यासाठी करावयाच्या उपाययोजना.**

**(३०) ३४३२१ (१०-०१-२०२२). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी, २०१६ ते जून २०२१ या साडे पाच वर्षाच्या कालावधीमध्ये ५७,२१६ युनीट रक्त तर २,८९,१५१ युनिट तांबड्या पेशींचा (पी आर बी सी) वापर होऊ शकला नसल्यामुळे मुदतबाह्य झालेले ६५,५६७ लिटर रक्त वाया गेले असल्याची बाब दिनांक १६ सप्टेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रक्ताचे एक युनिट हे ३५० मिली असते तर एक तांबड्या पेशींचा (पी.आर.बी .सी.) हे १७५.५ मिलीचे इतके असून रक्तातील प्लाझ्मा व रक्तपेशी हे घटक रुग्णांच्या उपचारासाठी महत्वाचे असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यस, रक्त दुषित अथवा संसर्गित तसेच मुदतबाह्य झाल्यामुळे तांबडया पेशींचा (PRBC) वापर होऊ शकला नसल्यामुळे टाकून दयावे लागले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रक्त वाया जाऊ नये यासाठी शासने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२२-०२-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

तथापि तांबड्या पेशीं (पी. आर. बी .सी. )ची बॅग १७५ मिली नसून २७५ मिली ते ३१० मिलीचे असते.

(३) हे अंशत: खरे आहे.

मागील साडे पाच वर्षातील रक्त दुषित असल्यामुळे (TTI Positive) वाया जाण्याचे सरासरी प्रमाण एकूण रक्त संकलनाच्या १.५९ टक्के आहे व मुदतबाह्य कारणास्तव रक्त वाया जाण्याचे सरासरी प्रमाण एकूण रक्त संकलनाच्या २.८७ टक्के आहे.

(४) रक्त वाया जाऊ नये म्हणून राज्य रक्त संक्रमण परिषदेने सर्व रक्तकेंद्राना खालील प्रमाणे सुचना दिलेल्या आहेत-

• रक्तकेंद्राच्या गरजेप्रमाणेच रक्त संकलित करण्यात यावे.

• रुग्णांना रक्तपिशव्या जारी करताना संकलनाच्या क्रमवारीनुसार म्हणजे First in First Out (FIFO) पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

• राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार एका रक्तकेंद्रात जादा असलेले रक्त गरज असलेल्या दुसऱ्या रक्तकेंद्रात पाठविण्यात यावे.

• शिबीर आयोजकांना एकाच दिवशी स्वैच्छिक रक्दान शिबीरे आयोजित करण्याऐवजी टप्याटप्याने (staggered manner) शिबीर आयोजन करण्यात यावी.

• रक्तदात्यांचा वैद्यकीय इतिहास (medical history) काळजीपूर्वक भरून घेण्यात यावी व रक्तदात्याची वैद्यकीय तपासणी योग्यरित्या करण्यात यावी.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोरीवली विभागातील गोराई येथील शासकीय जमिनीवरील भूखंड पोलिस ठाणे करीता मिळणेबाबत

**(३१) ३४३५६ (०७-०१-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली)** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली विभागातील गोराई येथील न.भू. क्र. ९८१ सर्वे क्र. २५८ हा भूखंड गोराई पोलिस ठाणे यांना मिळणेकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जूलै २०२०-२१ मध्ये वा त्यादरम्यान मा. गृह मंत्री यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोराई पोलिस ठाणे करिता न.भू.क्र. ९८१ सर्वे क्र. २५८ या सरकारी मिळकतीपैकी १००३.३५ चौ.मी. क्षेत्रफळाची जागा मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दि.१४/०२/२०२० च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे सुधारित प्रस्ताव सादर केला आहे. तद्‌नंतर विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडुन शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात आली आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने महसूल व वनविभाग यांनी केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (०३-०३-२०२२) :** (१) मा. मंत्री (गृह) कार्यालयाने दिनांक ०६/०४/२०२१ पासूनच्या नोंदी तपासल्या असता, लोकप्रतिनिधीचे पत्र प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही. दिनांक ०६/०४/२०२१ पूर्वीचे अभिलेख सदर कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे दि.०६/०४/२०२१ पूवीची माहिती निरंक असल्याचे त्यांच्या कार्यालयाने कळविले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियोजन आराखडा-२०३४ नुसार मौजे मनोरी येथील न.भू.क्र.९८१ च्या क्षेत्रावर प्रसुती गृह व दवाखाना तसेच महाविद्यालय / प्रशिक्षण केंद्र अशी विविध आरक्षणे असल्याचे दिसून येत असल्याने सदर जमीन गोराई पोलीस ठाणे व स्वच्छतागृह या प्रयोजनार्थ मंजूर करता येईल किंवा कसे, याबाबत सुस्पष्ट अभिप्राय देण्याची विनंती नगर विकास विभागास करण्यात आली आहे.

---

**रसायनी (ता.पनवेल, जि.रायगड) पाताळगंगा औद्योगिक वसाहतीतील मे. ॲन्थनी गॅरेज प्रा.लि., व्यवस्थापनाने कोणत्याही प्रकारची सूचना न देता कामगारांना कामावरून कमी केले असल्याबाबत**

**(३२) ३४३९३ (०५-०१-२०२२). श्री.महेश बालदी (उरण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रसायनी (ता.पनवेल, जि.रायगड) पाताळगंगा औद्योगिक वसाहतीतील मे. ॲन्थनी गॅरेज प्रा.लि., व्यवस्थापनाने कोणत्याही प्रकारची सूचना न देता कामगारांना कामावरून कमी केले असल्याचे माहे जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनी उभारण्यापासून १५ ते १७ वर्षे काम करणारे कामगार साधारण ११ वर्षापासून कंपनीत काम करत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनी व्यवस्थापनाने कामगारांना अतिशय तुटपुंजी रक्कम बँकेत जमा करून कामावरून कमी केल्यामुळे कामगारांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कामगारांवर अन्याय करणा-या पाताळगंगा औद्योगिक वसाहतीतील मे.ॲन्थनी गॅरेज प्रा.लि. व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा कामगारांना कामावर घेण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही,

मे. ॲन्थनी गॅरेज प्रा.लि., व्यवस्थापनाने ३२ कामगारांना दिनांक २४.०४.२०२१ रोजी लेखी पत्राव्दारे पूर्वसूचना देवून दिनांक १ मे २०२१ पासून कामावरून कमी केलेले आहे.

(२) हे खरे आहे,

(३) हे खरे नाही,

३२ कामगारांना कामावरून कमी केल्यानंतर कायदेशीर देय रकमापोटी व्यवस्थापनाने एक महिन्याचा नोटीस पगार, उपदान, कपात नुकसान भरपाई (आर.सी.), सुट्यांचा पगार व बोनस इ. त्यांचे बँक खात्यावर जमा करण्यात आलेले आहे.

(४) कामावर पूर्ववत घेण्याबाबतचा औद्योगीक विवाद, संघटनेने कामगार उप आयुक्त कार्यालय, रायगड या कार्यालयात उपस्थित केलेला असून विवादावर नियमानुसार कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाकडेवाडी (पुणे) येथील कामगार आयुक्त कार्यालयाच्या नवीन इमारतीचा प्रस्ताव शासनस्तरावर ४ वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत**

**(३३) ३४४५८ (०५-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाकडेवाडी (पुणे) येथे बैठया कौलारु इमारतीमध्ये कामगार आयुक्तांचे कार्यालय अनेक वर्षापासून कार्यान्वित असून सदर कार्यालयीन इमारत जीर्ण झाली असून भिंतीवरील रंग उडाल्यामुळे इमारत नादुरुस्त अवस्थेत असल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामगार आयुक्त कार्यालयांतर्गत पुण्यासह सोलापूर, सातारा,सांगली व कोल्हापूर या ५ जिल्हयांचे प्रशासनिक कामकाज चालविण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारतीच्या अत्याधुनिकरणाचा प्रस्ताव कामगार विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविण्यात आल्यावर त्यानुसार सार्व.बांधकाम विभागाने ५ मजली इमारतीच्या ४५ कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव त्याच दरम्यान कामगार विभागाकडे मान्य करुन ४ वर्षापूर्वी पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सार्व.बांधकाम विभागाने मंजूर करुन पाठविलेला प्रस्ताव कामगार विभागाकडून ४ वर्षापूर्वीच वित्त विभागाकडे पाठविण्यात आला असतांना, वित्त विभागाने अद्याप त्यास मान्यता दिलेली नसल्यामुळे कामानिमित्त येणाऱ्या नागरीकांना गैरसोई होत असल्याचे दिनांक. १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, ४ वर्षापासून वित्त विभागाकडे प्रलंबित असलेल्या सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
वाकडेवाडी (पुणे) येथे बैठ्या कौलारू इमारतीमध्ये अपर कामगार आयुक्तांचे कार्यालय अनेक वर्षापासून कार्यान्वित असून सदर कार्यालयीन इमारत जीर्ण झाली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांनी दि.२९.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये ४ मजली इमारत बांधकामासाठी रु.४४,०२,१०,९०२/- रक्कमेचे अंदाज पत्रक सादर केले होते.

(४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांनी दिनांक ०१.०९.२०२१ व दि.०३.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये बांधकामाचे सुधारीत अंदाजपत्रक सादर केल्यानुसार दिनांक १३.१२.२०२१ रोजी शासनाने वित्त विभागाच्या मान्यतेने रुपये ७८.३२ कोटी इमारत बांधकाम खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे व त्यालगतच्या परिसरात ससून रुग्णालय खेरीज**
**अन्य शासकीय रुग्णालय उभारण्याबाबत**

**(३४) ३४४६४ (१०-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयांसह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रात आरोग्य विषयक सोईसुविधा देणारे पुणे येथे ससून हे एकमेव शासकीय रुग्णालय आहे तथापि कोरोना संसर्गाच्या काळात रुग्णालयातील आरोग्य यंत्रणेवर येणार जादा ताण लक्षात घेता एखादे रुग्णालय पुणे वा लगतच्या परिसरात उभारणे गरजेचे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा पातळीवरील कोरोना आढावा बैठकीत ससूनच्या धर्तीवर औंध येथे दुसरे रुग्णालय उभारण्याबाबत विचार व्हावा अशी मागणी सदर बैठकीत लोकप्रतिनिधीनी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीत केलेल्या मागणीनुसार ससून रुग्णालयाप्रमाणे औंध येथे ११ मजली इमारत उभारुन ८०० ते १००० बेडसचे सुसज्ज रुग्णालय उभारण्या प्रकरणी कार्यवाही करावी व त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तसा प्रस्ताव पाठविण्याबाबत विभागाच्या अधिकाऱ्यांना दि. १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.उपमुख्यमंत्री तथा मा.पालकमंत्री, पुणे जिल्हा यांनी आदेशित केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून त्याबाबतचा प्रस्ताव आरोग्य विभागास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय,

(५) तसेच, प्रस्ताव अद्याप प्राप्त झाला नसल्यास सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पाठपुरावा करण्यात आला आहे काय?

**श्री. राजेश टोपे (२८-०२-२०२२) :** (१) कोरोना संसर्ग काळात रुग्णालयातील यंत्रणेवर ताण आला हे खरे आहे. त्यावेळी ससून रुग्णालयासोबतच औंध येथील जिल्हा रुग्णालयात सुद्धा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आला होता.

(२) हे खरे आहे.

(३) मा.उपमुख्यमंत्री यांनी सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय भाषणात याबाबत उल्लेख केलेला आहे.

(४) अद्याप सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या विभागास प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.
(५) जिल्हा शल्यचिकित्सक पुणे यांना दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये संचालक, आरोग्य सेवा कार्यालयाने याप्रकरणी कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

---

## जत तालुक्यातील (जि.सांगली) तुबचीबबलेश्वर योजनेच्या तिकोटा येथील सीमेलगत जवळ असलेल्या गावांना पाण्याचा लाभ मिळण्याबाबत

**(३५) ३४५०८ (०५-०१-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जत तालुक्यातील (जि.सांगली) येथील तुबचीबबलेश्वर योजनेच्या तिकोटा येथील वितरण हौद क्र.२ चा तलांक ५८० मीटर इतका असून तिकोटा वितरण हौद क्र.२ पासून हे अंतर अंदाजे १० किलोमीटर इतके आहे जत तालुक्यातील सीमेलगतच्या जवळपास २४ गावांचा सरासरी भूतलांक ५०० ते ५९० मीटर इतक असलेने सदर गावामधील तलाव भरुन व बोर नदीतून पाणी प्रवाहित केल्यास व त्या वर को.प.बंधारे बांधल्यास अतिरिक्त २० गावांना पाण्याचा लाभ होऊ शकतो असा प्राथमिक अहवाल कार्यकारी अभियंता म्हैसाळ पंपगृह क्र.२ सांगली यांचे दिनांक १३.८.२०२१ रोजी वा त्यासुमारास चे जा.क्र.सा.प.म./प्रशा-१ ५२३२/२०२१ यांनी अधिकृत सादर केलेला आहे हे खरे काय,
(२) असल्यास, प्राथमिक सर्वेक्षणा नुसार वितरण हौद क्र.२ (तिकोटा) ते जत तालुक्यातील सिमवरील तलाव हे Gravity ने प्रवाहित होऊ शकतात असे कार्यकारी अभियंता सांगली पाटबंधारे विभाग, सांगली यांनी सदर अहवालत अधिकृत सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरील प्राथमिक अहवालात शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयंत पाटील (२१-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१९/प्रक्र-१३६/१९/जसंअ, दि. ११/०८/२०२१ अन्वये वारणा प्रकल्पाच्या मंजूर बिगर सिंचन तरतूदीतील विना वापर ६ अघफू (TMC) पाणी म्हैसाळ योजनेत सिंचनाच्या वापरासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने जत तालुक्यातील वंचित गावांना सिंचनाचा लाभ देण्यासाठी सविस्तर प्राथमिक सर्वेक्षणाची कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संग्रामपूर (जि.बुलढाणा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील गैरसोयी बाबत

**(३६) ३४५१३ (१२-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी बहुल संग्रामपूर (जि.बुलढाणा) येथिल प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी गैरहजर असल्याने तेथे प्रसूतीस आलेल्या दोन गर्भवती महिलांची प्रसूती रुग्णाल्याच्या बाहेरच झाल्याची घटना दि. १८ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्याची मागणी नागरीकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर आरोग्य केद्रातील पदे देखील रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर घटनेची चौकशी करुन संबधित दोषीवर कारवाई करणेसह रुग्णांची गैरसाय होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२३-०२-२०२२) :** (१) हे अंशतः खरे आहे.
प्राथमिक आरोग्य केंद्र संग्रामपुर ता. संग्रामपुर जि. बुलढाणा येथे दि. १५.१०.२०२१ रोजी रात्री ८.३० वाजता एक गर्भवती महिलेला नातेवाईकांनी आणले असता, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैदयकिय अधिकारी व कर्मचारी गैरहजर असल्याने सदर महिलेची प्रसुती प्राथमिक आरोग्य केंद्राच्या शेजारच्या घरी दायी मार्फत करण्यात आली.
(२) हे खरे आहे.
(३) हे अंशतः खरे आहे.
प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैदयकिय अधिकारी यांची मंजूर २ पैकी २ पदे भरलेली असून कर्मचारी यांची १३ पैकी ०९ पदे भरलेली आहेत.
(४) सदर घटनेची चौकशी करुन जिल्हा आरोग्य अधिकारी यांचा दि. १८.१०.२०२१ चा अहवाल उपसंचालक यांच्यामार्फत दि. २२.१०.२०२१ रोजी प्राप्त झाला आहे. सदर अहवालानुसार आयुक्तालयाकडुन प्राथमिक आरोग्य केंद्र संग्रामपुर जि. बुलढाणा येथे कर्तव्यावर गैरहजर असणारे वैदयकिय अधिकारी व संबंधित तालुका वैदयकिय अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव मागविण्यात आला आहे. याव्यतिरिक्त जिल्हापरिषदेने प्राथमिक आरोग्य केंद्रातील ७ कर्मचाऱ्यांची एक वार्षिक वेतनवाढ रोखण्याची कार्यवाही केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालय येथे मोकळ्या जागेत इमारत बांधण्याबाबत**

**(३७) ३५१३८ (१०-०१-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालयाची इमारतीची दूरवस्था झाली असून रुग्णालयाचे आवरामध्ये असलेल्या जागेमध्ये पर्यायी व्यवस्था म्हणून तळमजला अधिक ४ (जी + ४) मजल्याची इमारत बांधण्यात यावी अशी मागणी कार्यकारी अभियंता, विभाग क्र २ यांच्याकडे जिल्हा शल्य चिकित्सक, उल्हासनगर यांनी दिनांक २३ जानेवारी, २०१९ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे अंदाज पत्रक तयार करून ही गेल्या दोन वर्षपासून प्रस्ताव पाठविण्यात आला नसल्याचे निदर्शनशास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यातयेत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२८-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर येथील इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही जिल्हा शल्य चिकित्सक, मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर यांचे स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील मेळघाट येथे कुपोषणामुळे गरोदर स्त्रिया, लहान मुलांचे मृत्यू होत असल्याप्रकरणी**

**(३८) ३५२७९ (१०-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील मेळघाटसह आदिवासी भागामध्ये कुपोषणामुळे गरोदर स्त्रिया, लहान मुलांचा मृत्यूच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने आदिवासी भागातील एकाही मुलाचा कुपोषणामुळे मृत्यू झाला तर त्याची जबाबदारी प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग यांची असून सर्व आदिवासी विभागांत गरोदर स्त्रियांची आणि मुलांची काळजी घेण्यासाठी स्त्रीरोग्यतज्ज्ञ आणि आहारतज्ज्ञांची नियुक्ती करण्यात यावी तसेच मेळघाट परिसरात अद्यावत रुग्णालय बांधण्याचे आदेश शासनाला दिल्याचे माहे ऑगस्ट-२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

जिल्हयातील नवसंजीवनी कार्यक्रमाच्या अहवालानुसार मेळघाट कार्यक्षेत्रात २०१६-१७ मध्ये ४०७ व २०२०-२१ मध्ये २०२ बालमृत्यू झालेले आहेत. तसेच माता मृत्यू अहवालानुसार मेळघाट कार्यक्षेत्रात २०१६-१७ मध्ये १३ व २०२०-२१ मध्ये १० माता मृत्यू झालेले आहेत.

सर्व माता मृत्यू व बालमृत्यू यांचे अन्वेषण करण्यात येते. त्यानुसार सदर बालमृत्यू व माता मृत्यू हे कुपोषणामुळे झालेले नसून इतर वैद्यकीय कारणांमुळे झालेले आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) या संदर्भात राज्य शासनामार्फत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत :-

i) मेळघाट कार्यक्षेत्रातील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयामध्ये नियमित तसेच कंत्राटी विशेषज्ञ पोषण पुनर्वसन केंद्र (एनआरसी) येथे आहारतज्ञ उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

ii) उपसंचालक, अकोला मंडळ यांच्या स्तरावरुन मेळघाट कार्यक्षेत्रामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर माता व बालकाची तपासणी करीता अकोला मंडळातील स्त्रीरोग तज्ञ व बालरोग तज्ञ यांना १५ दिवसाच्या कालावधीकरीता चक्राकार पध्दतीने प्रतिनियुक्ती देण्यात येते.

iii) मेळघाट कार्यक्षेत्रात दि.०५.०८.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये धारणी, जिल्हा अमरावती येथील ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयमध्ये श्रेणीवर्धन करण्यात आले.

iv) त्याचप्रमाणे माता व बालमृत्यू कमी करण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागामार्फत पुढीलप्रमाणे योजना राबविण्यात येतात.:-

अ) बाल आरोग्य संबंधी योजना- आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (SNCU), नवजात शिशू स्थिरीकरण कक्ष (NBSU), ग्राम बाल विकास केंद्र (VCDC), बाल उपचार केंद्र (CTC), पोषण पुर्नवसन केंद्र (NRC), Mother Absolute Affection (MAA) व राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (RBSK)

ब) माता आरोग्य संबंधी योजना- जननी सुरक्षा योजना, जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम, मानव विकास कार्यक्रम, प्रधानमंत्री मातृवंदना योजना व प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, नवसंजीवनी योजना (मातृत्व अनुदान योजना, भरारी पथक योजना, दायी बैठका योजना)

v) त्याचप्रमाणे, माहिला व बाल विकास विभागामार्फत एकात्मिक बाल विकास सेवा योजना, अमृत आहार योजना व पोषण अभियानांतर्गत आदिवासी विभागातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथे प्रादेशिक कामगार आयुक्त नसल्याने शेकडो कामगारांचे प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(३९) ३५३७६ (०५-०१-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे प्रादेशिक कामगार आयुक्तपद (केंद्रीय) गेल्या अनेक दिवसापासून रिक्त असल्याचे दिनांक १५.९.२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथील रेल्वे, आयुध निर्माण, खाण कामगारांची शेकडो प्रकरणे प्रलंबित असून येथील केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांनी मदत कोणाकडे मागायची अशी समस्या निर्माण झाली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून सदरील रिक्त पद तातडीने भरावे यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-०३-२०२२) :** (१) प्रादेशिक कामगार आयुक्त (केंद्रीय) हे पद दिनांक २३ मार्च, २०२१ पासून रिक्त आहे.

(२) मुख्य कामगार आयुक्त (केंद्रीय), नवी दिल्ली यांचे पत्र क्र. प्रशासन.१/३०(०८)/२०१६, दि.१३.४.२०२१ नुसार प्रादेशिक कामगार आयुक्त (केंद्रीय), नागपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार प्रादेशिक कामगार आयुक्त (केंद्रीय), रायपूर यांचेकडे सोपविण्यात आलेला असून ते प्रलंबित प्रकरणांवर सुनावणी घेत आहेत.

(३) सदर रिक्त पद भरण्याच्या दृष्टीने भारत सरकारच्या श्रम व रोजगार मंत्रालयाने दि.०१.१०.२०२१ रोजी कार्यालयीन ज्ञापन निर्गमित केलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथील शासकीय आयुर्वेद महाविदयालयातील विदयार्थ्यांसाठी वसतीगृह बांधण्याबाबत**

**(४०) ३५३८१ (०५-०१-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय आयुर्वेद महाविदयालयातील विदयार्थ्यांसाठी सन २०१८ मध्ये वसतीगृह बांधण्यास सुरुवात करण्यात आली परंतु निधी अभावी बांधकाम पूर्ण करण्यात आले नसल्यामुळे सुमारे ४०० विदयार्थ्यांचा निवासाचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे माहे ऑगस्ट २०२१, मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वसतीगृहांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत व वसतीगृहाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (१४-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे निंबोणी (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करणेबाबतचा प्रस्ताव**

**(४१) ३५५३१ (१०-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निंबोणी (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा अरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांच्यामार्फत शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता

मिळणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सार्वजनिक आरोग्यमंत्री यांना दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२८-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नवीन रुग्णालय सुरु करणे व कार्यान्वित रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे यासाठी जोडबृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा आयुक्तालयास्तरावरुन सुरु असून निंबोणी येथे ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्याची मागणी निकषानुसार जोडबृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## मौजे हुलजंती (जि.सोलापूर) येथील "ब' वर्ग तिर्थक्षेत्रांच्या विकास कामांसाठी शासनाकडून त्वरीत निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(४२) ३५५३२ (०७-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हुलजंती (जि.सोलापूर) येथील पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील श्री क्षेत्र महालिंगराया देवस्थान, (ता.मंगळवेढा), श्री क्षेत्र लक्ष्मीदेवी देवस्थान, लक्ष्मीदहिवडी (ता. मंगळवेढा) व श्री क्षेत्र कामसिध्द देवस्थान, हिवरगांव, (ता. मंगळवेढा), श्री क्षेत्र भैरवनाथ देवस्थान भोसे, (ता. मंगळवेढा), श्री क्षेत्र बसवेश्वर देवस्थान बोराळे, (ता. मंगळवेढा), श्री क्षेत्र कामसिध्द देवस्थान खोमनाळ, (ता. मंगळवेढा) श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान, तावशी, (ता. पंढरपूर), या "ब' वर्ग तिर्थक्षेत्राकडून विकास कामांसाठी शासनाकडून निधी मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला असून मा.ग्रामविकामंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ११/९/२०२१ रोजी वा त्या सुमारास या तिर्थक्षेत्रांना विकास निधी मिळणेबाबतचे निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने उक्त "ब' दर्जाच्या तिर्थक्षेत्राच्या विकास कामांना त्वरीत निधी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-०३-२०२२) :** (१) अंशत: हे खरे आहे.

(२) श्री क्षेत्र महालिंगराया देवस्थान, (ता.मंगळवेढा) तीर्थक्षेत्रास रु.१.०० कोटी, श्री क्षेत्र लक्ष्मीदेवी देवस्थान, लक्ष्मीदहिवडी (ता. मंगळवेढा) रु.६८.०० लक्ष, श्री क्षेत्र बसवेश्वर देवस्थान बोराळे, (ता. मंगळवेढा) रु.१६२.०० लक्ष व श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान, तावशी, (ता. पंढरपूर) रु.१०६.६८ लक्ष इतका निधी मंजूर केला आहे. जि.प.सोलापूर यांच्याकडून प्राप्त प्रस्तावानुसार प्रलंबित देयकांचा निधी अदा केला आहे. श्री क्षेत्र कामसिध्द देवस्थान, हिवरगांव, (ता. मंगळवेढा), श्री क्षेत्र भैरवनाथ देवस्थान भोसे, (ता. मंगळवेढा) व श्री क्षेत्र कामसिध्द देवस्थान खोमनाळ, (ता. मंगळवेढा) यांना ब वर्ग दर्जा दिला असून शासन निकष व निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपूर-मंगळवेढा (जि.सोलापूर) विधानसभा मतदार संघातील मंगळवेढा तालुक्यातील गावांची वाहतूक व्यवस्था कोलमडल्याने शेतमाल व जनजीवनावर परिणाम होत असल्याने या रस्त्यावरील पूलाचे काम त्वरीत पूर्ण करणेबाबत**

**(४३) ३५५३३ (०६-०१-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर-मंगळवेढा (जि.सोलापूर) विधानसभा मतदार संघातील मंगळवेढा तालुक्यातील रहाटेवाडी, तामदर्डी रस्त्यावरील पूलावर पावसाळयात ओढयाला पाणी आल्याने पूरस्थिती निर्माण होवून ८ ते १० फुट पाणी थांबल्याने तामदर्डी, सिध्दापूर, तांडोर या आजुबाजूच्या गावातील जनतेचा संपर्क न होणे परिणामी येथील वाहतूक व्यवस्था कोलमडल्याने शेतमाल व जनजीवनावर विपरीत परिणाम होणे याकरीता या रस्त्यावरील पूलाचे काम त्वरीत पूर्ण करणेबाबत मा.मुख्य अभियंता, मा.अधिक्षक अभियंता, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना पुणे विभाग पुणे यांना दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी त्या सुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नातील रहाटेवाडी, तामदर्डी पूलाची पाहणी करुन काय निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, सदरहू ठिकाणी पुलाचे काम तातडीने होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०३-२०२२) :** (१) निवेदन प्राप्त झाले, हे खरे आहे.

(२) व (३) मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या ADB टप्पा-२ अंतर्गत सदर पुलाच्या कामास दिनांक २४ फेब्रुवारी, २०२१ रोजी प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली असून या अनुषंगाने प्रत्यक्ष काम हाती घेण्याबाबतची पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे अटाळी (ता.खामगाव, जि.बुलढाणा) येथील श्री विठ्ठल रुक्मिणी, श्री संत भोजने महाराज संस्थान या प्रसिध्द ब वर्ग तीर्थक्षेत्र विकास योजनेतील मंजूर कामांना त्वरीत निधी देणेबाबत**

**(४४) ३५६८२ (०६-०१-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अटाळी (ता.खामगाव, जि.बुलढाणा) येथील श्री विठ्ठल रुक्मिणी, श्री संत भोजने महाराज संस्थान या प्रसिध्द ब वर्ग तीर्थक्षेत्र विकास योजनेतील विविध मंजूर कामांना शासन निर्णय क्रमांक तीर्थवि २०१८/प्र.क्र./३०५/ योजना-६ दिनांक ६ मार्च, २०१९ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती व त्यानुषंगाने निविदा प्रक्रिया सुध्दा पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी उपसचिव ग्रामविकास विभाग यांचेकडे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पत्रान्वये कळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रक्रिया पूर्ण होवूनही अद्यापपर्यंत शासनाच्या संबंधित विभागाकडून सदर कामांना निधी व आदेश प्राप्त झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास सदरहू कामांना शासनाकडून चौकशीच्या अनुषंगाने आदेश व निधी त्वरीत मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्याकडील पत्राच्या अनुषंगाने प्रस्तुत कामास मुदतवाढ देण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील रुग्ण महात्मा फुले जनआरोग्य योजनेच्या लाभापासून वंचित असलेबाबत**

**(४५) ३५९०३ (१०-०१-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनाच्या महामारीच्या काळात शासनाने सर्व रुग्णांना मोफत उपचार घेता यावे म्हणून महात्मा फुले जनआरोग्य योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासनाने जाचक निकष लावले असून अतितीव्र लक्षणे असलेल्या तथा ज्यांना व्हेंटिलेटर तथा ऑक्सिजनची गरज आहे अशा रुग्णांनाच प्रत्यक्षात योजनेचा लाभ मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर जिल्हयातील ग्रामीण भागात २९९९ तर शहरात १४०७ रुग्णांचा कोरोनाने मृत्यु झाला असुन जनआरोग्य योजनेचे कोरोनाचे एकूण रुग्ण १,६४,२७७ एवढे असून त्यापैकी ६,८९७ एवढे जनआरोग्य योजनेचे लाभ मिळाला तसेच म्युकरमायकोसिसचे रुग्ण ५४७ असून सदर योजनेतून फक्त ८६ रुग्णांनाच मोफत उपचार मिळाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जनआरोग्य योजनेचे निकष शिथिल करण्याची मागणी होत असून याबाबत आरोग्यमंत्र्यांनी सकारात्मकता दर्शवूनही जाचक निकष कायम ठेवल्याने मोफत उपचारापासून अनेक रुगणांना वंचित राहवे लागत असल्याचे माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय.
(५) असल्यास, जनआरोग्य योजनेचे निकष शिथिल करुन रुग्णांना मोफत उपचार मिळणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२३-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
कोरोना साथरोगाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कोविड रुग्णांना उपचार घेताना आर्थिक भार येऊ नये व राज्यातील सर्व नागरिकांना आरोग्य विषयक हमी व दिलासा देण्याच्या उद्देशाने दिनांक २३ मे, २०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व नागरिकांसाठी खुली करण्यात आली आहे.
(२) योजनेंतर्गत अधिकाधिक कोविड रुग्णांना लाभ प्राप्त व्हावा म्हणून अनेक सवलती देण्यात आल्या आहेत. कोविड आजाराची सौम्य व गंभीर लक्षणे असलेले सर्व रुग्ण ज्यांची SPO२ पातळी ९४ पेक्षा कमी आहे त्यांना योजनेमध्ये लाभ अनुज्ञेय आहेत. शासनाच्या प्रोटोकॉल प्रमाणे लक्षण विरहित कोविड रुग्ण कोविड केअर सेंटर/ घरी विलगीकरणामध्ये राहून उपचार घेतात.
(३) हे खरे नाही.
सोलापूर जिल्ह्यामध्ये योजनेतील अंगीकृत रुग्णालयांमध्ये १५,७४६ कोविड रुग्णांवर मोफत उपचार झाले असून त्यापैकी १०,०७५ रुग्णांची कागदपत्रे संगणक प्रणालीवर अद्ययावत करण्यात आली आहेत.
सोलापूर जिल्ह्यामध्ये योजनेतील अंगीकृत रुग्णालयांमध्ये ३७४ म्युकरमायकोसीस रुग्णांवर मोफत उपचार झाले असून त्यापैकी २०३ रुग्णांची कागदपत्रे संगणक प्रणालीवर अद्ययावत करण्यात आली आहेत.
(४), (५) व (६) हे खरे नाही.
कोविड आजारासाठी महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजेमध्ये लाभ मिळण्यासाठी SPO२ पातळी ८० पेक्षा कमी असणे ही अट बदलून अधिकाधिक कोविड रुग्णांना योजनेचा लाभ मिळावा म्हणून SPO२ पातळी ९४ पेक्षा कमी अशी निकषामध्ये शिथिलता आणण्यात आली होती.
१ एप्रिल २०२० ते १६ नोव्हेंबर २०२१ या कालावधीमध्ये ११,५०,३८८ कोविड रुग्णांवर योजनेतील अंगीकृत रुग्णालयांमध्ये मोफत उपचार झाले असून त्यापैकी १,८४,०१६ रुग्णांची कागदपत्रे संगणक प्रणालीवर अद्ययावत करण्यात आली आहेत.

---

### मौजे निंबी, (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथील स्मशानभूमीतील कॉक्रीट शेडच्या निकृष्ट कामाबाबत

**(४६) ३६०३३ (०७-०१-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे निंबी, (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथील स्मशानभूमीती शेड सन २०१२-१३ मध्ये जनसुविधा योजनेतर्गत बांधण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेडला तडे गेले असून नागरिकांनी या शेडवर दहनविधी करु नये याबाबतची माहिती सरपंच यांनी नागरिकांना दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निंबी येथील रुखमाबाई साहेबराव हराळ या महिलेचे शनिवारी सकाळी निधन झाले सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास नातेवाईकांसह अंत्यविधीचा कार्यक्रम पार पडताच अवघ्या १० ते १५ मिनिटांतच स्मशानभूमीती शेडचा स्लॅब कोसळला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मृताच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्या ग्रामपंचायतीवर गटविकास अधिकाऱ्यांनी त्वरीत कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुनजबाबदार असणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०३-२०२२) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्मशानभूमी शेड बांधकामाबाबत सखोल चौकशी करून अहवाल उप अभियंता, बांधकाम उपविभाग,पुसद यांच्याकडून मागविला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**(४७) ३६०४२ (१०-०१-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्ते अपघातात सापडलेल्या रुग्णांना तत्पर वैद्यकीय सेवा मिळून रुग्णांचे प्राण वाचावेत वा अपंगत्वाचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने शासनाने दि. १६ सप्टेंबर, २०२० रोजीच्या मंत्रीमंडळाचे बैठकीमध्ये “बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना” लागू करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार राज्यात सदर योजनेची अंमलबजावणी दि. १४ ऑक्टोबर, २०२० रोजीपासून सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरु करण्यांत आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात वसई जि. पालघर येथील माहिती कार्यकत्यांनी शासनाकडे माहिती मागविली असतां सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अवर सचिव तथा माहिती अधिकारी यांनी “सदर योजनेची अजूनही अंमलबजावणीची प्रशासकीय कार्यवाही सुरु असल्याने सदरची योजना अजुन कुठल्याही जिल्हयात सुरु केली नाही” असे सदर माहिती कार्यकर्त्यांसह अनेक संबंधित नागरिकांनाही कळविले असल्याचे दि. १० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या योजनेस १ वर्षे होऊनही अद्याप अंमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२३-०२-२०२२) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० अन्वये स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना राज्यात विमा तत्त्वावर राबविण्यास मान्यता देण्यात आली असून या शासन निर्णयान्वये योजनेच्या अमलबजावणीबाबत स्वरुप व कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत रस्ते अपघातातील जखमी झालेल्या रुग्णाची परिस्थिती स्थिर करण्यासाठी लागणा-या वैद्यकिय सेवा पहिल्या ७२ तासासाठी नजिकच्या अंगीकृत शासकीय किंवा खाजगी रुग्णालयामधुन ७४ उपचार पध्दतीच्या माध्यमातून उपचार देण्यात येणार आहेत. यासाठी रस्ते अपघातातील मृत्यु व विकलांगता कमी करुन जखमी व्यक्तीचे जीवरक्षण करण्याच्या हेतूने प्रति रुग्ण प्रति अपघात रु.३०,०००/- पर्यंतचा खर्च अंतिम केलेल्या पॅकेजच्या दरानुसार या योजनेंतर्गत रुग्णालयास अदा करण्यात येणार आहे. योजना राबविण्यासाठी Emergency आणि Polytrauma Services देण्याची सोय असणारी शासकीय व खाजगी रुग्णालये अंगीकृत करण्यात येत आहेत.

या योजनेमध्ये एकूण ७४ प्रोसिजर्स च्या माध्यमातून अपघातग्रस्त व्यक्तींना आरोग्य सेवा देण्यात येणार आहेत. या ७४ प्रोसिजर्सचा आढावा घेतला असता यातील ४० प्रोसिजर्स या एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या प्रोसिजर्स सोबत जूळत आहेत तर उर्वरीत ३४ प्रोसिजर्स जुळत नाहीत असे आढळून आले आहे. याअनुषंगाने फेरतपासणी करुन योजना राबविण्याची प्रक्रिया कार्यवाहीत आहे.

---

## काल्हेर (जि.ठाणे) ग्रामपंचायती मध्ये १४ वित्त आयोग, ग्रामनिधी व इतर निधींमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४८) ३६१४५ (०६-०१-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काल्हेर (जि.ठाणे) ग्रामपंचायती मध्ये १४ वित्त आयोग, ग्रामनिधी व इतर निधींमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खर आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करून दोषीवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासह इतरांनी १२/१०/२०२० रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे लेखी स्वरुपात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार संबधीत दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०३-२०२२) :** (१) अशी बाब नाही,

(२) अशी बाब नाही.

(३) अशी बाब नाही.

(४) अशी बाब नाही.

---

**लेंगरे (ता.खानापूर, जि.सांगली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचा-यांची अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(४९) ३६५९९ (१०-०१-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लेंगरे (ता.खानापूर, जि.सांगली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रत कर्मचा-यांची अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ही रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२८-०२-२०२२) :** (१) प्राप्त अहवालानुसार हे खरे आहे.

लेंगरे (ता.खानापूर, जि.सांगली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील १५ मंजूर पदांपैकी नियमित ०५ पदे भरलेली असून उर्वरित १० काल्पनिक कुशल व अकुशल पदे रिक्त आहेत.

(२) व (३) प्राप्त अहवालानुसार ग्रामविकास विभागाच्या दि.२६.०८.२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रातील काल्पनिक कुशल व अकुशल पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी सीएसएसी ई गव्हर्न सर्व्हीसेस इंडीया लि. या कंपनीकडून जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून अर्ज करण्याची मुदत दि.१६.११.२०२१ रोजी संपली असून सदरील पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) कार्यवाही सुरू आहे.

---

**मौजे अटाळी (ता. खामगाव) येथे १४ वित्त आयोग निधी अंतर्गत पाणीपुरवठा पाईपलाईनच्या कामांमध्ये अनियमितता झालेबाबत**

**(५०) ३७६४७ (१०-०१-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अटाळी (ता. खामगाव) येथे १४ वित्त आयोग निधी अंतर्गत पाणी पुरवठा पाईपलाइनच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा, गटविकास अधिकारी पंचायत समिती खामगाव, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जिल्हा परिषद बुलढाणा, तसेच संबंधित अधिकारी यांना

श्री रुपेश खेकडे स्थानिक ग्रामस्थ यांनी दिनांक ११/८/२०२० रोजी वा त्यासुमारास तक्रार केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी गटविकास अधिकारी पंचायत समिती खामगाव यांनी यांचे पत्र क्रमांक जा. क्र/पं स खा/ साप्रवि/ ग्राप/ २०२१ पंचायत विभाग पंचायत समिती खामगाव यांनी चौकशी समिती गठित करण्यात येऊन पंधरा दिवसात चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी अहवालावरून निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदार ग्रामसेवक व संबंधितांवर दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) होय, गट विकास अधिकारी, पंचायत समिती खामगाव यांनी जिल्हा स्तरावरून चौकशी करण्याबाबत सुचित केलेले आहे, हे खरे आहे.
(३) चौकशी अद्याप पुर्ण झाली नसल्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) सदर योजनेची विहिर ही, मस प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रात असल्याने विहिरीचे सभोवताली पाणी असल्याने संपुर्ण पापाईपलाईनचे मोजमापे सद्यस्थितीत घेता येत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.